# ठक्कर्स डेव्हलपर्सच्या नफ्यात ५१.१९ टक्क्यांनी वाढ

नाशिक- ठक्कर्स डेव्हलपर्स लि. या उत्तर महाराष्ट्रातील रिअल इस्टेट क्षेत्रातील अग्रगण्य पब्लिक लिमिटेड कंपनीने मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात याच कालावधीत मिळविलेल्या नफ्यात ५१.१९ टक्क्यांनी वाढ नोंदवली आहे.

- मागील आर्थिक वर्षात उपरोक्त कालावधीत कंपनीने रु. ८२६.४० लाख इतका नफा मिळविला होता तर चालू आर्थिक वर्षाच्या याच कालावधीत ही रक्कम रु. १२४९.४७ लाख इतकी वाढली आहे.मागील आर्थिक वर्षात या कालावधीत कंपनीची विक्री रु. २४३८.६२ लाख इतकी होती तर चालू आर्थिक वर्षात याच कालावधीत ही रक्कम रु. ३६५६.६३ लाख इतकी वाढली आहे. विक्रीतील ही वाढ ४९.९४ टक्के आहे. कंपनीच्या संचालक मंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत चालू आर्थिक वर्षात डिसेंबर २०१२ पर्यंत कंपनीने केलेल्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला, त्यावेळी ही माहिती देण्यात आली.

देशदूत 21/2/13